चैतन्य लहरी                                खंड 2 - अंक 8



तुमच्याकडे विशाल हृदय नसेल, तर तुमच्याकडे चांगली आज्ञा असू शकत नाही.

बुध्दपूजा (रशिया)

इस्टर पूजेचे भाषण {संक्षिप्त}

इस्टबर्न, इंग्लंड
22 एप्रिल 1990

प.पू.श्री माताजींनी इस्टर पूजेच्या वेळी आम्हाला एकविसाव्या सहस्त्रारदिनाच्या वेळी घ्यावयाच्या मोठ्या उडीसाठी तयार केलं. श्री येशू ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाची, पुजा करण्याची आणि एक समर्पित, सदाचरणी व प्रखर अशा आदर्शाची तरतूद केल्याबद्दल, मिळवून दिल्याबद्दल त्यांचे आभारप्रदर्शन करण्याची ही आपली संधी आहे, असे त्यांनी सांगितले. मुख्यत्वेकरुन, पाश्चात्य सहजयोगी येशू ख्रिस्ताप्रत प्रचंड प्रमाणांत शरणागत असतात. ही शरणागती प्रकाशित हवी. आत्मसाक्षात्काराच्या आधी सुध्दा कोणा उच्चतम अस्तित्वावर लोक विश्वास ठेवतात. पण त्यांचा विश्वास हा संबंधाशिवाय असतो व एक प्रकारचा फोलपणा ठरतो. त्यांचा देवाशी विशेष संबंध आहे अशी त्यांची, एक बनावट अद्भुतरम्य कल्पना असते. आणि वाईट गोष्ट अशी की, हा अंधविश्वास अनेकदा लोकांना अशी कल्पना करुन देतो की देवावर त्यांचा हक्क आहे, जो त्याच्यावर विश्वास ठेवण्याच्या क्रियेमुळे त्यांनी जिंकून घेतला आहे. आणि त्यांना भौतिक सौख्य मिळवून देणे देवाला भाग आहे. येशू ख्रिस्ताने अशा लोकांना सूचना दिली आहे, "तुम्ही मला ख्रिस्त, ख्रिस्त म्हणून हांका माराल, पण मी तुम्हांला ओळखणार नाही. फक्त आत्मसाक्षात्कारानंतर आपला सर्व देवतांशी संबंध जुळतो. पण जेव्हां सहजयोगी-यांमध्ये गहनतेचा अभाव होतो त्यावेळी हा संबंधसुध्दां सूक्ष्मतेमध्ये -हास पावतो. सहजयोगींना मग असं वाटतं की त्यांचं सौख्य मिळवून देणे सहजयोगाला भाग आहे.

श्री माताजींनी विशद केले की, आत्मसाक्षात्कारानंतर, जेव्हां आपला ख्रिस्ताशी संबंध जुळतो, त्यावेळी आपला दृष्टीकोन पूर्णपणे बदलला पाहिजे. ख्रिस्ताचे गुण आपण आत्मसात केले पाहिजेत. ख्रिस्ताच्या आयुष्याने आपल्याला अशा त-हेचं जीवन व्यतित करण्याची प्रेरणा दिली पाहिजे, जे मंदिरस्थ केले जाईल, जे ख्रिस्ताच्या जीवनाचे प्रतिबिंब म्हणून ओळखले जाईल. ख्रिस्त विश्वांसाठी स्वतःला जबाबदार समजत होता. देवी-पुराणामध्ये "सर्व विश्वाचा आधार" असे त्याचे वर्णन केले आहे. सहजयोगी मंडळींनीसुध्दां पूर्ण मानवतेच्या बंधनमुक्तिसाठी आणि मानवाच्या सामुहिक उत्थानासांठी आपल्याला जबाबदार समजले पाहिजे. आपण दक्ष राहिले पाहिजे आणि आपल्या जबाबदा-यांची जाणिव ठेवली पाहिजे.

ख्रिस्ताला पूर्णविळ विश्वाच्या हितासंबंधी कळकळ होती. ख्रिस्त म्हणजेच ज्ञान. त्याला त्याचे ध्येय माहित होते. पूर्ण धैर्याने, प्रखरतेने, आणि समर्पणाने त्याने सत्य सांगितले. सहजयोगीयांनासुध्दां सहजयोगाचे ज्ञान पाहिजे, आणि दिखाऊपणा न दाखवितां, धैर्य व समर्पिततेने त्यांनी सहजयोगा विषयी बोलले पाहिजे. व्यक्तिमत्वामधून स्वतःला दर्शवण्याची सत्याची क्षमता आहे. आपण सहजयोगी आहोत असा जर आपला खरोखर विश्वास असेल तर, जसे ख्रिस्ताने सत्याबद्दल सांगितले त्याप्रकारे सहजयोगाबद्दल आपण बोलूं शकलो पाहिजे. जर आपण तसे करूं शकत नसलो तर ख्रिस्तासारख्या प्रखरतेचा आपल्यामध्ये अभाव आहे. त्याचे कार्य ख्रिस्ताला मौल्यवान होते आणि स्वतःचा मौल्यवान वेळ क्षुल्लक गोष्टीवर त्याने घालविला नाही. आपल्यालासुध्दां आपल्या आत्मसाक्षात्काराचे मूल्य जाणून, आपल्या सहजयोगामधील कार्याबद्दल समर्पण व प्रखरता राखली पाहिजे.

जेव्हां आपण ख्रिस्ताच्या या गुणांना आत्मसात करूं त्यावेळी ध्यानाचा आनंद लुटूं शकूं. सहजयोग्याची पहिली खूण म्हणजे, केव्हां ध्यान करूं, या वेळाची तो वाट पहात असतो. "त्या वेळी तुम्ही दैवी शक्तिशी जोडले गेले असतां आणि सर्वात जास्त आनंद लुटतां" जर सहजयोगी ध्यानासांठी उठूं शकत नसले आणि जागे राहूं शकत नसले तर त्यांच्यामध्ये येशू ख्रिस्त जागृत झाला नाही. जर आज्ञा चक्रावर त्यांचे आशिर्वाद असतील, तर आपण ध्यानाचा आनंद उपभोगतो आणि ध्यानाच्या मनस्थितीतून बाहेर पडूं शकत नाही. अंतर्यामीच्या जागृतिने दैवी शक्तिशी झालेले संधान पहाणे म्हणजेच निरानंद, अमर्याद आनंद. कशासांठीसुध्दां सहजयोगी हा आनंद देऊन टाकू शकत नाहीत. हा उपभोग-ण्यासांठी आपल्या गहनतेला आपल्याला स्पर्श करावा लागतो. गहनता सर्व सहजयोग्यांना असते पण त्यांनी तिला स्पर्श करावा लागतो.

येशू ख्रिस्त पूर्ण त्यागाचं जीवन जगले, त्यांना त्यांचं पुनरुत्थान साधायचं होतं. त्याच्या ध्येयाला ते समर्पित होते. सहजयोगींनी पण पूर्ण समर्पित असलं पाहिजे. शिवाय पुढे पडणारं आपलं प्रत्येक पाऊल किती आनंद-दायी आहे. सहजयोगी मंडळींनी स्वतःचा आळस त्यागला पाहिजे. केव्हां सहजयोगी म्हणतात, त्यांनी त्यांचं कार्य केलं आहे आतां तरुणांनी पुढे आलं पाहिजे. केव्हां एक सूक्ष्मातील सुस्ती त्यांच्यामध्ये कार्यान्वित होत आहे असे दिसते. श्री माताजींनी म्हटले आहे की तुम्हाला तुमच्या आडव्या पातळीवरील वाढीबरोबर संतुलन राखण्यासाठी तुमची उर्ध्वगामी वाढ होत असतांना अतोनात परिश्रम घेतले पाहिजेत. तुम्ही सहजयोगी आहांत हे तुम्हांला लक्षात ठेवले पाहिजे आणि तुम्हांला सहजयोगामध्ये काय केले पाहिजे, आणि ते कसे साध्य करावयाचे, हे तुम्हांला समजले पाहिजे. ती श्रेष्ठता मिळविल्याशिवाय तुम्ही संतुष्ट होता कामा नये. मध्यम दर्जाला सहजयोगामध्ये स्थान नाही. उत्कृष्टपणांतूनच तुम्ही आनंद मिळवूं शकतां. अव्वल दर्जामधूनच तुम्ही खरोखर सहजयोगी बनूं शकाल.

ख्रिस्तांना माहित होतं की ते एक साधन होते. ते अशी व्यक्ति होते ज्यांना आज्ञाचक्र उघडायचे होते. त्यांच्या पुनरुत्थानांतून त्यांना ते साध्य करावयाचे होते व त्यांनी ते साध्य केले. जर आज्ञाचक्र उघडले नसते, तर सहस्त्रार उघडणे कधीच शक्य झाले नसते. सहजयोग्यांनापण समजले पाहिजे की, परमचैतन्य शक्ति कार्यान्वित होण्यासाठी ते तिची साधने आहेत. परमचैतन्य सर्व कांही करेल आणि आमचा सांभाळ करेल हे विधान एकदम मूर्खपणाचे आहे, असे जर असते तर मानवाच्या निर्मितीची गरजच नव्हती. त्यांचे आशिर्वाद मोजण्यांपेक्षां सहजयोग्यांनी आतां त्यांची कार्ये मोजली पाहिजेत. त्यांना त्यांच्या गहनतेला पोहोचले पाहिजे. तुम्ही त्या गहनतेला पोहोचल्याशिवाय परमचैतन्य कारणीभूत होऊ शकत नाही. ते असहाय्य असते. फक्त तुमच्यामधून ते कार्यान्वित होते.

केव्हां परमचैतन्याची स्वतःची शैली आहे. जर तुम्हां लोकांना त्याने कार्यान्वित व्हावे असे वाटत असेल तरच ते कार्य करते. ती शक्ति आहे. तुम्ही साधन आहांत. श्री माताजी म्हणाल्या, आपण प्रखर, समर्पित, गहन अशी सहजयोगाची साधने झाले पाहिजे आणि पहा कशा उत्तमतेने तुम्ही लोकांशी संपर्क साधाल, किती लोकांना तुम्ही आत्मसाक्षात्कार देऊं शकाल, किती लोकांना तुम्ही त्यांची शारीरिक, मानसिक स्थिती सुधारण्यास मदत करतां, आणि सहजयोगाबद्दल तुम्ही किती बोलणार आहांत. श्री माताजी म्हणाल्या, की अशाप्रकारे सहजयोग मानवाचे सामुहिक उत्थान करणार आहे.



सहस्त्रार पुजेचे भाषण {संक्षिप्त} रोम, इटली
6 मे 1990

इतकी सारी वर्षे या एकविसाव्या सहस्त्रार दिनाची मी वाट पहात होते. आतां एक नवे परिवर्तन यावयाचे आहे. त्याची घोषणा तुम्ही ऐकतां. {एक मोठा ढगांचा गडगडाट} अजूनपर्यंत आपण सामूहिक चेतनां, चक्रे नाडया यांच्याबद्दल वापर करीत होतो पण गेल्या एकवीस वर्षांमध्ये तुमच्यामध्ये किती शक्त्या वृध्दीगत झाल्या आहे याची कदाचित आपल्याला कल्पना नाही.

ब्रम्हचैतन्याला सर्व कांही माहित असते. आणि सर्व निसर्ग तुमची प्रगति, तुमचे हित साधण्यासांठी योग्य वेळी कार्य करीत असतो. आतां तुम्हांला शक्त्या आहेत या विश्वासांत रहा. तुमच्या स्वतःच्या समजणूकीत येणारं हे नवं परिवर्तन आहे. अजूनपर्यंत तुम्हांला माहित आहे, तुम्हांला चैतन्यलहरी जाणवित होत्या, लोकांचे रोगनिवारण करूं शकत होता, परमचैतन्य समजत हाते. पण तुमच्यामध्ये काय चैतन्ययुक्त शक्त्या काम करीत आहेत ते तुम्हांला माहीत नाही, आणि हे नवे परिवर्तन येणार आहे. या नव्या बदलाबरोबर तुम्हांला एक नवे व्यक्तिमत्व स्विकारले पाहिजे. - घोषणा {मोठा ढगांचा गडगडाट}. अजूनपर्यंत मी तुम्हांला सहजयोगाबद्दल उघडपणे न बोलण्यास सांगितले होते. पण आतां सर्वांना त्याबद्दल सांगण्याची, प्रकटन करण्याची, बोलण्याची वेळ आली आहे. नाहीतर जग म्हणेल, आम्हांला याबद्दल कधीच माहीत नव्हते. अजूनपर्यंत आपण सहजयोग कमी पातळीवर ठेवला होता कारण सर्वप्रथम, तुम्ही खरोखर सुरेख सहजयोगी व्हावं, ज्योयोगे तुमची जीवनपध्दती, वागणे, समजणूक आणि विचार पाहून लोकांना कळेल, की खरोखर हे अव्दितिय, एका वेगळया प्रकारचे लोक आहेत, अशी माझी इच्छा होती. तुमच्यामध्ये या सर्व शक्त्या उसळताहेत पण कांही कारणास्तव तुम्ही त्या लपवित आहांत हें तुम्ही समजून घेतले पाहिजे.

आतां श्री माताजींनी तुमची डोकेदुखी बरी करावी, तुमच्या कुटुंबाकडे, पत्नीकडे, मुलांकडे पहावे ते दिवस गेले आहेत, संपुष्टात आले आहेत.

आतां तुम्ही स्वतःबद्दलच नव्हे तर तुमचे आश्रम, शहरें, देश आणि पूर्ण जगाबद्दल जबाबदार आहांत.

आतां तुम्ही सर्व राजदरबारामध्यें आहांत. तुमची जबाबदारी उचला. तुम्ही काय आहांत ते स्विकारा. तुमच्या शक्त्या जाणून घ्या. - तुम्ही काय करूं शकता. ते दिवस गेले, जेव्हा तुम्ही तुमचे आशिर्वाद आणि चमत्कार मोजत होतां. आतां तुम्हांला तुमच्या शक्त्या मोजल्या पाहिजेत. आणि त्या मी कशाप्रकारे वापरूं शकतो?

आजपासून हे नवं पर्व चालूं होत आहे. या दिवसाची मी वाट पहात होते तुमच्यासांठी, तुम्ही सहजयोगी आहांत ते तुमच्या स्वतःच्या स्वार्थी हेतूंसाठी नव्हे, तुमची कुटुंबे, जाती, देश वगैरेंसाठी नव्हे, तर पूर्ण जगासांठी. तुमचा "स्व" वाढवा.

तुम्हांला ती दिव्यदृष्टी पाहिजे, जी अनेकवेळां मी तुम्हां लोकांसमोर मांडली आहे की तुम्हांला मानवतेचे पुनरूत्थान केले पाहिजे. आतां आत्मविश्वास ठेवा. फाजील ताजाळूपणा नको. हे कार्य खास {स्पेशल} माणसांकडून होणार नाही. कारण त्यांना अहंकार आहे. हे काम त्या लोकांकडून होणार आहे ज्यांच्याकडे महान यशाचा किंवा श्रीमंतीचा किंवा कांही संपादन केल्याचा अहंकार नाही. खिस्ताने सांगितले आहे की सुईच्या भोकांतून उंट जाऊं शकेल पण श्रीमंत माणूस देवाच्या राज्यांत प्रवेश करूं शकणार नाही कारण त्याचा अहंकार हत्तीहून मोठा असतो.

या नव्या जाणीवेमध्ये प्रवेश करताना आपल्या निगेटीव्ह प्रति अहंकारबद्दल काळजी करणे सोडू या. फक्त एक कबुलीजवाब आहे, की मी एक सहजयोगी आहे आणि आतां एकविसाव्या सहस्त्रारानंतर मी महायोगी आहे.

आता आपल्याला उघडपणे म्हटले पाहिजे, या मूलगामी लोकांना सांगितले पाहिजे, "तुम्हांला सत्याबद्दल माहिती नाही, किंवा कार्य करणाऱ्या त्या शक्तिबद्दल माहिती नाही. मृगजळामागे धांवणारे तुम्ही मूर्ख लोक आहांत आणि तुम्ही नरकात शेवट पावणारं".

तुम्ही लोकांना सांगू शकता की नवी खबर आली आहे की खोटेपणामागे धांवणे तुम्हांला देवाकडे नेणार नाही प्रेमाच्या शक्तिवर आमचा विश्वास आहे. घृणेच्या शक्तिवर नाही. प्रत्येकामध्ये सत्य शोधण्याची क्षमता आहे, आणि त्या आपल्याला वचन दिलेल्या स्वर्गात-देवाच्या राज्यांत जाण्याची क्षमता आहे असा आमचा विश्वास आहे.

हे सर्व निरर्थक प्रश्न की माझे कुटुंब, माझी पत्नी, माझी मुले, माझे घर, माझी मालमत्ता, माझे पैसे हे सर्व "माझे" प्रथम संपुष्टांत आले पाहिजे. कारण उदात्त राजा त्याच्या राज्याचा असतो त्याप्रमाणे तुम्ही पूर्ण जगाचे असावयास पाहिजे.

आतां तुम्ही पूर्णपणे स्वतंत्र आहांत, आणि तुमच्या आनंदाचे स्त्रोत तुमचा आत्मा आहे. सर्व गोष्टींपासून तुम्ही अलिप्त आहांत. त्या अलिप्तपणामध्येच तुम्ही प्रत्येकाचे पोषण करणार आहांत. अलिप्तता निर्विचार जाणिवेतुन येते. जेव्हा तुम्ही कोणाकडे पाहतां, तुमच्या निर्विचार स्थितीमध्ये जा. तावडतोब तुम्हाला अलिप्तता जाणवेल. आणि पूर्ण प्रश्नाचे उत्तर मिळेल. तुमच्या मध्ये असलेली महानशक्ति तुमच्या मेंदूमध्ये आहे, तुम्ही ज्ञानी आहांत. नुसते तुम्ही निर्विचारांत जा आणि पूर्ण ज्ञानाची लायब्ररी {वाचनालय} तुमच्यासमोर उघडे होऊ शकते. त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रांत तुम्ही इतके पुढे गेले आहांत पण या फार क्षुल्लक गोष्टी आहेत ज्या तुम्हांला इथे तिथे थोडासा आनंद देतील पण मुख्य गोष्ट म्हणजे किती लोकांना आपण जागृति देतो, आत्मसाक्षात्कार देतो आणि सहजयोगाबद्दल किती निवेदन करतो.

सहजयोग नुसता जातां जातां करण्यासाठी नाही. सहजयोग हे अंगीकारलेलें कार्य आहे. ती पूर्णपणे गुंतवणूक आहे. नाहीतर तुम्ही सहजयोगांसाठी खरोखर निरूपयोगी आहांत. हजारो निरूपयोगी लोक असण्यापेक्षां थोडे जबाबदार लोक असलेले बरे. तर तुमच्यासांठी तुम्ही काय ठरवले आहे आणि सहजयोगासांठी काय ठरवले आहे ते पाहूं या. तुम्ही जर सहजयोगाची निवड केली, तर तुम्हांला मुख्य कोणती गोष्ट केली पाहिजे ते लक्षांत घ्या. चित्त पूर्णपणे सहजयोगाकडे पाहिजे. सहजयोगामध्ये काय चालले आहे? आपण कुठे आहोत? आपण कुठे चाललो आहे? श्री माताजी कुठे आहेत? त्या कोणत्या भागांत आहेत? त्या काय करीत आहेत? जर तुमचे चित्त तुम्ही तिथे नेले तर तुमची निगेटीव्हिटी पूर्णपणे अदृश्य होइल. तर आतां तुम्ही महायोगी आहांत. आपल्याला तो महायोग केला पाहिजे. जोपर्यंत तुम्ही ती पातळी साध्य करीत नाही तापर्यंत तुम्ही अजून जुन्या जमान्यांतले आहांत असं तुम्ही समजलं पाहिजे. आणि मला माहित नाही चक्राच्या फिरण्यांत किती शिल्लक राहतील.

आतां तुमच्याबद्दल संशय बाळगूं नका. सहजयोगाच्या मर्यादासकट सरळ पुढे चला. तर, मर्यादा असल्याच पाहिजेत. नितिमत्तेच्या मर्यादा असल्याच पाहिजेत. वागणुकीच्या मर्यादासुध्दां सहजयोगामध्यें कांही जास्त मर्यादा नाहीत. पण मुख्य मर्यादा ही की तुम्ही फार चांगल्या नितिमत्तेचे लोक असावयास हवे. आणि तुमचे स्वरूप, तुमची वागणूक कीळसवाणी असतां नये.

आज इथे पूर्ण जगांतून लोक आलेले आहेत. आणि तुम्ही जा आणि हा संदेश बाकी सर्व लोकांना, ज्यांना मी भेटले नाही त्यांना द्या. - "श्री माताजींनी, विष्णूमायेकरवीसुध्दां आधीच घोषणा केली आहे, की तुम्ही सर्व आतां महायोगी झाला आहांत. ते दर्शवा. ते प्रकट करा. तुमच्यामधील पूर्ण विश्वासासह आणि या श्रमशक्तिसह. आणि माझी खात्री आहे आपण सर्व यशस्वी होऊ.

## पृथ्वीचे आज्ञाचक्र उघडतांना

रशिया
12 मे 17 मे 1990

गेल्या सहा महिन्यात श्री आदिशक्तिने सोव्हिएट युनियनला आशिर्वादित करण्याची ही चौथी वेळ. परिणाम लोकविलक्षण, प्रचंड आहे. दोन हजारांवर सहजयोगी मॉस्को, कीव्ह आणि लेनिनग्राड या मुख्य शहरांमध्ये नियमीतपणे ध्यान करीत आहेत. हजार माणसांचे सभागृहाच्या सर्व जागा नुसत्या सहजयोग्यांनीच गच्च भरल्या. मग शेवटी लोकांच्या लांबलचक रांगांची व्यवस्था करता यावी म्हणून चार हजार लोक मावू शकतील असा स्टेडिअम भाड्याने घेतला. विमानतळावर आणि मग परत स्टुडिओमध्ये राष्ट्रीय दूरसंचार विभागाने श्री माताजींची टी.व्ही. वर मुलाखत घेतली. अशा प्रकारे हजारो लोकांना त्यांचा आत्मसाक्षात्कार या माध्यमायोगे मिळणे शक्य होईल. इच्छुक साधकांना श्री माताजींचे छायाचित्रे पोस्टाने पाठविली जातील. त्यामुळे त्यांनी सहजयोग साधना शक्य होईल. कम्युनिस्ट पार्टीचे मुख्य व अनेक मंत्र्यांना त्यांचा आत्मसाक्षात्कार मिळाला. शिक्षण क्षेत्राच्या मंत्रीमंडळाने मॉस्कोमधील त्यांच्या एका शाळेत सहजयोगाची ओळख करुन दिली आहे. आणि हळूहळू राष्ट्रीय पातळीवर तो पसरला जाईल. वैद्यकीय खात्याने वैद्यकीय जीवन शास्त्राच्या प्रश्नाँसाठी सहजयोग केंद्र प्रस्थापित केले आहे. सोव्हिएट युनियनमधील सर्व ठिकाणच्या तीनशे डॉक्टरांच्या एक स्पेशल परिषदेमध्ये श्री माताजींनी भाषण दिले. आणि त्यांना आत्मसाक्षात्कार दिला. त्यांना इतके कुतुहल वाटले की त्यांनी सहजयोगाच्या डॉक्टर्सना एक जून पासून नऊ जून पर्यन्त होणा-वैद्यकीय परिषदेत भाग घेण्याचे आमंत्रण दिले. रशियन साधकांवर श्री माताजी इतक्या खूप झाल्या की जूनच्या अखेरीला सोव्हिएट युनियनला परत भेट देऊन आशिर्वादित करण्याचे त्यांनी मान्य केले. आज्ञा नक्कीच उघडेल अशी आम्ही प्रार्थना करतो. रशियन साधकांच्या सूज्ञतेचं त्यांनी कौतुक केलं. त्या म्हणाल्या सूज्ञतेशिवाय स्वातंत्र्य तुम्ही हाताळू शकत नाही. अमेरिकन लोकांच काय झालं आहे ते पहा.

### वैद्यकीय परिषदेमधील श्री माताजींचे भाषण

मॉस्को

रोग्याला बरे करणे खूप साधे आहे. जर झाडाला रोग असेल आणि तुम्ही त्याला बरे करण्याचा प्रयत्न केला तर ते होणार नाही. जर तुम्ही सूक्ष्मामध्ये गेला आणि मूळांना बरे केले तर ते होईल. जर तुम्ही त्याच्या मूळापर्यन्त पोहोचला, त्याच्या केंद्राचे पोषण केले आणि कुंडलिनी नामक शक्तिशी संपर्क साधून संतुलन साधले तर सर्व कांही किती सुरेख होईल.

लिव्हर आणि स्प्लीन -

लिव्हरमधील उष्णतेमुळे कालांतराने फुफ्फुसे शक्तिहीन होऊन कोसळतात. त्यामुळे दमा (अस्थमा) होतो. जेव्हा लिव्हरला पुरेशी पोषकद्रव्ये मिळत नाहीत तेव्हा ते जास्त क्रीयाशील बनते. गरोदर स्त्री जास्त कार्यमग्न असेल तर अर्भकाला स्प्लीन बद्दल प्रश्न उद्भवतात. आघात देणारी बातमी स्प्लीनला क्षोमांत टाकते. सर्व आणि बाणीसाठी स्प्लीन लाल रक्तपेशींना तयार करत असते.


आधुनिक जीवन म्हणजे सतत "आणि-बाणीच" आहे. स्प्लीनला (प्लीहेला) सतत मिळणा-या धक्क्यामुळे ती असुरक्षीत होते. आणि कर्करोगाचा तिच्यावर सहज परिणाम होऊ शकतो. आणि अशा धोक्याच्या क्षणांत डावीकडून काही सुरुवात झाल्यास रक्ताचा कॅन्सर होऊ शकतो.

व्हायरस -

व्हायरस डावीकडून येतात. सामूहिक सुप्त चेतनेमध्ये स्थिरावलेला मृत पदार्थ वस्तू असतात.

आत्मा

आपला आत्मा पाठीमागे असतो. तो सात लूप्समध्ये असतो. सॅक्रम अस्थीमध्ये आठवा असतो. त्याच्या घटनेमध्ये सर्व पंचमहाभूते आणि काही असते. सर्व एंडोक्राइन्स आणि इतर ग्रंथींची तो काळजी घेतो. आपल्या सर्व प्रतिक्षिप्त क्रिया तो करीत असतो. संगणकाच्या प्रोग्रॅमसारखे ते असते. आता वैद्यकीय शास्त्राने असा शोध लावला आहे की प्रत्येक पेशीमध्ये त्या प्रकारचं "लूप त-हेच्या" वर्णनाचे, ग्रहण करणारे रिसेप्टर्स आहेत. जेव्हा या रिसेप्टर्स मध्ये डोपामिन तयार केले जाते त्यावेळी (एपीलेप्सी) अपस्मार, मानीसक दुखणी वगैरे होतात. एका व्यक्तिमत्वाच्या पाठीवर जेव्हा दुसरा आत्मा बसतो आणि एक विशिष्ठ पध्दतीने वागतो यालाच भूतबाधा म्हणतात. त्यावेळी हे डोपामीन तयार होते. भूतबाधा उजव्या बाजूकडूनसुध्दा होऊ शकते जिथे हिटलरसारखे मृतात्मे आहेत.



## श्री बुध्दपूजा (संक्षिप्त)

लेनिनग्राड
14 मे 1990

रशिया मागची आज्ञा आहे. चीनसुध्दा मागची आज्ञा आहे. हे चक्र उघडण्यासाठी श्री बुध्दांची पुजा करण्यात येत आहे. आज्ञाचक्राच्या पातळीवर विचार असतात. तुम्ही सर्व एकाच दैवी शक्तिशी संबंधित असल्यामुळे तिथे मतभेद नाहीत. जर मतभेद असेल तर तुम्ही सहजयोगी नाही.

सत्याच्या साम्राज्यांत तुमची काळजी घेतली जात आहे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येक पायरीवर कोणीतरी आहे जे तुमची काळजी घेत आहे. जेव्हा मी मॉस्को विमानतळावर प्रवेश केला, तेव्हा माझ्या लक्षांत आलं की माझ्या पर्समध्ये व्हिसा नाही. इमिग्रेशन ऑफिसरने फक्त स्मितहास्य केलं आणि कांही प्रश्न न विचारतां फक्त मला व्हिसा दिला. सर्व सहजयोगी हा चमत्कार पाहून आश्चर्यचकीत झाले. सूक्ष्मशक्ति प्रत्येक तपशीलाकडे लक्ष देते आणि तिचे अस्तित्व तुम्हाला दाखवून देण्यासाठी चमत्कार करते.

सहजयोगामध्ये भिती असतां नये. सगळी भिती टाकून द्या. तुम्हाला जर कोणी धाकदपटशा दाखविला तर तो सहजयोगाबाहेर फेकला जाईल. तुम्हाला तुमच्या आत्म्याशिवाय दुस-या कोणीही तुमच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करता नये. प्रेमशक्तिशिवाय ताकदवान दुसरी कोणतीही शक्ति नाही. सहजयोग गंभीर नाही. आनंददायी आहे. ती एक स्थिती आहे.

आत काल तुमचा गुलाम आहे. तुम्ही कालातित आहात. तुम्हाला कोणी दुखवू शकत नाही. कोणी तुमच्या खोड्या काढू पाहेल, तो स्वतःच्याच खोड्यांत फसेल. सहजयोगाच्या प्रकाशात तुम्हाला तुमच्या हातांत साप दिसतो. त्याला नुसते फेकून द्या. तुम्ही लहान नाही, तुम्ही वयोवृध्द नाही. तुम्ही फक्त आनंदात आहात.

तुमच्याकडे विशाल हृदय नसेल, तर तुमच्याकडे चांगली आज्ञा असू शकत नाही. आज्ञेचा मंत्र आहे क्षं - मी क्षमा करतो. पाठीमागच्या आज्ञेचा मंत्र आहे "हं" मी आहे. अशा प्रकारे हं क्षं.

ईश्वर तुम्हाला आशिर्वादित करो.

## विशुध्दी चक्र

गुण -

डावी विशुध्दी - भाऊ बहिणीचे नाते, आत्मसन्मान.

पकडीचे कारण -

दोषी वाटणे, अनैतिक वर्तणूक, कावेबाजपणे बोलणे, मर्मभेदी बोलणे
आत्मविश्वासाचा अभाव, शब्दांचा अभाव.

उपाय -

1. श्री विष्णुमायेचा (श्रीकृष्णांची भगिनी) मंत्र म्हणणे.
2. "श्री माताजी, मी मुळीच दोषी नाही. तुमच्या कृपेमध्येमी आत्मा आहे मी दोषी कसा असेन?
3. विशुध्दी चक्राला व्हायब्रेशन्स द्या.
4. चुकीच्या गोष्टी केल्यावर किंवा स्वतःच्या अहंकारात गुरफटल्यावर दोषी वाटून घेणे म्हणजेच स्वतःच्या अहंकाराचे समर्थन करणे टाळा.
5. भाऊबहिणीच्या नात्यामध्ये पावित्र्य वृध्दिंगत करा.
6. भूतकाळातील अनैतिकता अथवा दुसरे काही अपराध यांना सामोरे जा आणि हे समजून घ्या की श्री माताजी तुम्हाला क्षमा करतात. तुम्हाला दोषी वाटण्याची जरूर नाही.
7. ईश्वरी प्रेमाचा अविर्भाव म्हणून तुमचे मूल्यमापन करा. स्वतःला अपुरे, अथवा निरर्थक समजू नका. दुस-यांना तुमच्यावर दबाव घालू देऊ नका.
8. दुस-यांशी सहजयोगाबद्दल आत्मविश्वासाने बोला.
9. हृदयापासून तन्मयतेने भजने म्हणा.
   तुमच्या आवाज श्री माताजींनी भक्ति करण्यासाठी वापरा.
10. उपहासात्मक, टोमणे मारणे, मर्मभेदी बोलणे सोडा.
11. अगुरुचा एखादा मंत्र तुम्ही म्हणत असाल तर खालील मंत्र म्हणून त्याचा प्रभाव नष्ट केला पाहीजे, "श्री माताजी सर्व मंत्रांचे उगमस्थान तुम्हीच आहात" किंवा "सर्व मंत्र सिध्दी"

## लोकांवर प्रभाव कसा पाडावा.

प.पू. श्री माताजींचे भाषण

हॉलंड
17/9/86

लोकांवर प्रभाव पाडण्यासाठी आपला स्वतःचा स्वतःवर किती ताबा आहे हे आपल्याला माहिती पाहिजे. ते फार महत्वाचे आहे. उदा. काही लोकांना योग्य प्रतिमा नसते आणि ते दुस-यांवर छाप पाडण्याचा प्रयत्न आणि ते उपहासात्मक ठरते. ज्या व्यक्तिला स्वतःची प्रतिमा नाही त्या व्यक्तिचा प्रभाव कोणावरच पडत नाही. त्यामुळे बाह्यांगावर कार्य करण्यापूर्वी अंतरंगावर कार्य केले पाहिजे.

तुम्ही लोकांशी बोलतांना बोलण्याची, चालण्याची योग्य पध्दत असणे, हे फार महत्वाचे आहे. हे सर्व काट छाट करुन सुव्यवस्थित केले पाहिजे, जसे गळून गेल्यासारखे चालणे, पाय इकडे तिकडे फेकत चालणे सरळ ताठ चाला. ताठ बसा, आणि लोकांना दिसू द्या की सर्वप्रथम तुमचा तुमच्यामध्ये विश्वास आहे. जर तुमचा तुमच्यामध्ये विश्वास नसेल, म्हणजे कोणतेही तुमचा स्तःवर विश्वास नसल्याचे दर्शविणारे असेल तर त्यामुळे तुम्ही लोकांवर छाप पाडू शकत नाही.

तर तुमचा आत्मविश्वास तुमच्या सर्व वर्तणुकीवरुन जसे बोलणे, चालणे, बसणे, संपर्क साधणे यामधून प्रतित झाला पाहिजे. एक विश्वासाची भावना पाहिजे. पण ही विश्वासाची भावना माणसात केव्हा येते केव्हा त्याला कळतं की तो पूर्णपणे सुरक्षित आहे. सहजयोगामध्ये तुम्हाला कळतं, तुमचं मध्य हृदय सुरक्षित आहे, ते स्वतःला सांगा, "श्री माताजी माझ्याबरोबर आहेत. श्री माताजी मला मदत करीत आहेत आणि मी श्री माताजींबरोबर आहे. मला कसलीच काळजी नाही." मग तुमचं हे केंद्र व्यवस्थित राहील. अर्थात, हे तुम्ही इतरांना सांगू शकत नाही. तरीपण तुम्हाला व्यक्तिमत्व असेल, तर तुम्ही सहज ते इतरांमध्ये शोषून घेऊ शकतां. पण जर तुम्हाला स्वतःबद्दल आत्मविश्वास नसेल तर तुम्ही ते करू शकत नाही. तर स्वतःच्या अंतरंगात प्रथम विश्वास प्रस्थापित केला पाहिजे. सहजयोग्यांना फार सहजपणे म्हणतां येतं की, "मी आत्मा आहे. मी बालक आहे, आदिशक्तिने स्वतःहून वेचलेला असा मी आहे," मग तुमच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास असला पाहिजे.

जसं, जेव्हा कोणी आंत येतं तेव्हा त्यांच्याशी तुम्ही अत्यंत हळूवारपणे बोललं पाहिजे. आंत येणारा तो दुसरा देव आहे, असं समजून जर माझ्यामध्ये आत्मा आहे, तर त्याच्यामध्ये सुध्दा आहे. म्हणून तो व्यवस्थित बसतो ना, आरामांत आहे ना, त्याला कांही चहा वगैरे पाहिजे कां विचारा, त्याला आरामात ठेवा, तुम्हाला कोणत्याही प्रकारे त्रासा झाला नाही, संताप आला नाही, पण त्याला भेटून आनंदच झाला आहे असे दर्शवा. आणि तुम्ही दयाळूपणा प्रस्थापित करता. कांही वेळां आत्मविश्वासाच्या अभावामुळे एखाद्या व्यक्तिविषयी तुम्हाला बेचैन वाटते. हा बेचैनपणा, नर्व्हसनेस असुरक्षिततेची खूण आहे. दुस-या व्यक्तिशी बोलताना बेचैन नसले पाहिजे. अशाप्रकारे असलं पाहिजे की दुस-या व्यक्तिला पुरेपूर विश्वास वाटला पाहिजे. आणि ही व्यक्ति फार चांगली आहे असे वाटले पाहिजे.

दुसरा मार्ग म्हणजे इतरांना बोलू द्या. त्यांचे नीट ऐका. आणि स्वतः बोलू नका. आणि एकदां कां ते कांही म्हणाले की म्हणा,"हे बरोबर आहे, शंकाच नाही. मी तुमच्याशी सहमत आहे, पण ...." मग तुम्ही सुरवात करा. म्हणजे तुम्ही त्यांना नुसते तुमच्या "नाही, तसे नव्हे" अशा शब्दांनी गोंधळवीत नाही पण उलट ते काय म्हणतात ते तुम्ही पाहतां, तुम्ही मला बघा. असे मी अनेक वेळा करते. जेव्हा कोणी काही म्हणतं, तेव्हां,"हो, ते खरं आहे पण असं बघा, हे असं आहे...." त्यामुळे ते आक्षेप घेत नाहीत. त्यांना वाटतं त्या गोष्टीची दुसरी बाजू सुध्दा तुम्ही पाहीली आहे. तुम्ही संतुलनात आहात. तुम्ही नुसत्या तुमच्या कल्पना लोकांवर लादत नाही. एका प्रकारे, तुम्ही लादत असता, पण तुम्ही ते अशा प्रकारे करतां की तसे तुम्ही वागत आहांत याचा कोणालाही धक्का बसत नाही.

आतां पोशाख सुध्दा. मी म्हणते पोशाख फार महत्वाचा आहे. समजा तुमचा कोणाशी अधिकृतीरत्या संपर्क आहे, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे व्यवहाराचे कपडे घालणे. पोशाख जो व्यवहारात लागतो, खूप रेघा असलेला डार्क निळा सूट नव्हे, योग्य, थ्रीपीस स्मार्ट पोशाख, स्वच्छ बूट आणि चांगले विंचरलेले केस, कदाचित काही वेळां थोडे तेल लावलेले. चांगल्या स्मार्ट व्यवहारी माणसासारखे दिसा.

मग तुम्हाला तुमच्या संस्थेविषयी बोलायचे असेल तुम्ही "मी" म्हणतां नये. तुम्ही "आम्ही" म्हटले पाहिजे. आम्ही करत नाही,"आम्ही", नेहमी संस्थेचा उल्लेख करा, स्वतःचा नाही. "मी असे करणार नाही. मला त्याचा तिरस्कार आहे. मी त्यावर विश्वास ठेवतो". हे एकदम फेल आहे. "आम्हांला काय करायचे आहे. त्यावर आम्ही विश्वास ठेवतो. आम्हांला असं वाटतं आणि तुमचं मत काय आहे? आमच्याकडे अशा प्रकारची गोष्ट आहे." किंवा कांही तुम्हांला आपल्या संस्थेबद्दल सांगावयाचे असेल ते किंवा स्वतःच्या उत्पादनाबद्दल किंवा कशाबद्दल किंवा कशाबद्दल, तुम्हाला त्यांना सांगितले पाहिजे,"आतां पहा, हे आहे ते उपलब्ध आहे. आतां हे इथे आहे आणि त्याने असे खूप चांगले कार्य केले आहे ते अशाप्रकारे काम करते आणि आमच्याकडे त्याबद्दल चांगले अहवाल आले आहेत. अहवाल हे इथे आहेत. ते काय आहेत ते तुम्ही पाहू शकतां. आणि तुम्हांला आवडल्यास तुम्ही वापरू शकता. आणि स्वतःच पाहा.

तुम्ही चांगल्या त-हेने सज्ज असले पाहिजे. समजा तुमच्याकडे कांही उत्पादन आहे. तर त्याविषयी तुम्हांला सर्व काही माहीती पाहिजे. माहितीपत्रक तिथे पाहिजे. "हे इथे आहे. हे कृपा करून घ्या. तुम्ही स्वतःहून. पाहू शकतां. त्यांना ते काय आहे ते समजावून सांगा. उत्पादनामुळे बाजारपेठ जिंकली जात नाही, तर ते उत्पादन कशारितीने समोर उभारले जाते त्यावर असते. जर कोणाला बरे वाटत नसेल तर काय अडचण आहे ते तुम्ही सांगा."आम्हाला हा असा प्रश्न आहे आतां त्याचे उत्तर काय ते सांगा". मग त्या माणसाला वाईट वाटत नाही जर त्या व्यक्तीला सरळ सरळ सांगितले तर त्यांना ते आवडत नाही. नाही,त्यांना आवडत नाही. तुम्हाला आवडायचं नाही, मी जर सरळ सरळ तुम्हाला सांगितलं तर।, - पण मी तुम्हाला अशा त--हेने सांगते, नाजुक पध्दतीने सहानुभुतिने. ज्यायोगे सहज समजेल, पचविलं जाईल अशा अनुकूल रितीने. ते फार महत्वाचं आहे, लोकांना समजेल अशी तुमची पध्दत असली पाहिजे, योग्य प्रकारची वर्तणूक हवी.

खरं म्हणजे,, लोकांवर छाप न मारल्यामुळे तुम्ही त्यांच्यावर छाप पाडता. कलेला लपविण्यातच कला आहे. तिला उघडकीला आणतांना मुद्दाम कांही करायला नको.इतर व्यक्तींशी बोलताना सुध्दां ते काय म्हणत आहेत हे तुम्हाला कळलं नाही तरीही, तुम्हांला समजत आहे आणि तुम्ही ऐकतां आहात असं दाखवलं पाहिजे. ते हे असेल, नाहीतर ते असेल, कांहीही हास्यास्पद असेल. जेव्हा तुम्हाला तीन व्यक्तींशी किंवा पाच किंवा दहा व्यक्तींशी व्यवहार करावयाचा असेल, त्यावेळी त्यांच्यामध्ये चांगल्या भावना उत्पन्न करण्याचा प्रयत्न करा. उदा. आतां तुम्ही लग्न करावं असं मला वाटतं. तर मी तुम्हाला तिच्याविषयी सांगेन, ती काय आहे, अशाप्रकारे की ज्यामुळे तुम्हांला वाईट वाटणार नाही, तिला लागणार नाही, पण तुम्हाला तयार होता येईल कारण नंतर

तुम्ही तिच्याबद्दल ऐकाल, की अमकातमका असं म्हणतं होता, आणि श्री माताजींनी कधीच सांगितलं नाही. म्हणून खूप हळूवारपणे तुम्ही सांगितलं पाहिजे,"असं पहा, तिला थोडया थोडया ह्या गोष्टी आहेत. पण ते ठीक आहे, ती खूप खूप सौम्य होऊ शकते. ती सर्व संभाळू शकते". आणि हे तुमच्यावर अवलंबून असते की तुम्ही कशा प्रकारे हे संभाळू शकतां. त्यामुळे तुम्हाला त्या व्यक्ती बद्दल माहिती असते. आपण सर्व समजून आहोत आणि त्याबद्दल जबाबदारही आहोत, असं वाटतं, आतां ही माझी जबाबदारी आहे असं वाटतं.

मी काही क्लृप्त्या वापरते, त्या माझ्या नैसर्गिक आहेत. पण तुम्हीही त्या आत्मसात करू शकता. ते कठीण नाही. इतक्या लहान लहान गोष्टींनी कसा फरक पडतो, पहा. ते जेव्हा आजारी असतात तेव्हां तुम्ही त्यांची काळजी घेतली पाहिजे. त्यांची मुलं आजारी आहेत की काय ते पहा. त्यांच्या पत्नीला काही आजारपण आलं आहे कां? तुम्हाला कळकळ वाटली पाहिजे. आणि तुम्ही ओळखले गेला पाहिजे. संस्थेला तुम्ही कुटुंबासारखं वागवलं पाहिजे. तिचं काय बिनसलयं? तिला बरं वाटतंय ना? मदत हवी आहे का? कधीकधी फुले पाठवा. ज्यावेळी पती आजारी आहेत किंवा पत्नी आजारी आहे किंवा मुलांबद्दल चौकशी करा. या सर्व गोष्टींना खूप अर्थ आहे.

तुम्हाला खालच्या थराला जायला नको. आकर्षून घेण्यासाठी तुम्हाला उच्चतर गेले पाहिजे. हा फरक आहे. दुस-यांच्या पातळीवर खाली झुकायचे की उच्चतर जायचे, पण उच्चतर स्थितीला जाताना तुम्ही उच्चस्तराला जात आहात हे सुचित करू नका, मत्सर निर्माण करू नका, ज्यामुळे त्यांना वाटेल याला स्वतः म्हणजे कोण मोठे वाटतो!, खूप हळूवारतेने रहा. तुम्ही जर त्याहून खाली असाल अथवा त्यांच्या त-हेचे असाल, तर ते कसे काय अनुकरण करतील?

---

चुकीची दुरुस्तीः मागील अंकावर चुकुन अंक नं. 5 व 6 असे छापले गेले आहे तरी ते अंक नं. 6 व 7 असे वाचावे.